**RNI No. MAHBIL /2009/31733**
**Reg. No. MCS/173/2016-18**

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

**वर्ष ३, अंक ३१]** **बुधवार, एप्रिल १२, २०१७/चैत्र २२, शके १९३९** **[पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००**

**असाधारण क्रमांक ३९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ७ एप्रिल २०१७

**अधिसूचना**

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३.**

क्रमांक असुका. २०१३/प्र.क्र.३६१/नापु-२२.— राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ (२०१३ चा २०) मधील कलम १४ द्वारा प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, राज्य शासन, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कलम १५ अन्वये " जिल्हा तक्रार निवारण अधिकारी " म्हणून नेमणूक करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून " जिल्हा तक्रार निवारण अधिकारी " नेमणुकीबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :—

१. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत राज्यातील जनतेकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी सदरहू अधिनियमाच्या कलम १५ अन्वये संबंधित जिल्ह्यांतील अन्न सुरक्षा योजनेशी संबंधित नसलेले अपर जिल्हाधिकारी यांची " जिल्हा तक्रार निवारण अधिकारी " (District Grievance Redressal Officer) म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

२. मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यासाठी सदर शिधावाटप क्षेत्र ज्या महसुली जिल्ह्यामध्ये आहे, त्या मुंबई, मुंबई उपनगर व ठाणे या जिल्ह्यांतील अपर जिल्हाधिकारी यांची त्या कार्यक्षेत्राचे " जिल्हा तक्रार निवारण अधिकारी " म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

३. अधिनियमाची अंमलबजावणी योग्यरीत्या पार पडण्याच्या दृष्टीने अपर जिल्हाधिकारी त्यांच्या स्तरावर त्यांच्या अधिनस्त अधिकाऱ्यांचा समावेश करून एक स्वतंत्र कक्ष निर्माण करून त्या कक्षाद्वारे अधिनियमामध्ये अभिप्रेत असलेली तक्रार निवारण यंत्रणा उभी करून तक्रार निवारणाचे कामकाज हाताळतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सतीश सुपे,**
शासनाचे उप सचिव.

## FOOD, CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 7th April, 2017

*NOTIFICATION*

NATIONAL FOOD SECURITY ACT, 2013.

No. Asuka 2013/C.R. 361/CS-22.— In exercise of the powers conferred under section 14 of the National Food Security Act, 2013 (No. 20 of 2013) and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, the State Government, is hereby pleased to make the following decision regardig appointment of "District Grievance Redressal Officer" under section 15 of the National Food Security Act, 2013 :—

1. Additional Collector of the district who is not concerned in the implementation of National Food Security Act, 2013 is hereby appointed under section 15 of the said act as a "District Grievance Redressal Officer" of the respected district to resolve the complaints received under National Food Security Act, 2013.

2. Additional Collector of the Revenue District *i.e.* Mumbai, Mumbai Suburban and Thane has been appointed as a "District Grievance Redressal Officer" to resolve the complaints received in Mumbai-Thane Rationing Area as per territory covered under above revenue districts.

3. For proper implementation of the said Act Additional Collector will constitute the Cell incorporating his subordinates to form Grievance Redressal Mechanism intended in the said Act and the Cell mentioned above will proceed accordingly.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH SUPE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.